# जि.प. स्वनिधीमधील बांधकामे

## जि.प. स्वनिधी - सर्व समावेशक कामे

- या योजनेमधून प्रत्येक जिल्हा परिषद सदस्य यांना ठराविक निधी मंजुर असतो. यामधून बांधकाम विभागाकडील कामे जिल्हा परिषद सदस्य यांनी मुख्य लेखा व वित्त अधिकारी यांचेमार्फत सुचविल्यास त्या कामाचे अंदाजपत्रक तयार करण्यासाठी उप अभियंता बांधकाम यांना कळविले जाते. यासाठी काम सार्वजनिक असणे आवश्यक आहे. तसेच ते ग्रामपंचायतीचे जागेवर बांधणे आवश्यक आहे. तसेच काम पूर्ण झालेनंतर ग्रामपंचायतीने ताब्यात घेवून त्याची देखभाल दुरुस्ती करणे आवश्यक आहे. त्यासाठी अंदाजपत्रकाबरोबर ग्रामपंचायतीचा उतारा व ठराव जोडला जातो.
- अंदाजपत्रक बांधकाम विभागाकडे प्राप्त झालेनंतर त्याची वित्तीय छाननी करणेसाठी वित्त विभागाकडे पाठविले जाते. वित्त विभागाकडून छाननी झालेनंतर त्यास प्रशासकिय मान्यता व तांत्रीक मान्यता घेतली जाते.